# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १२१/२०१८

सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, परिपत्रक क्र. ३३/२०१८, दि. ०१ मार्च, २०१८ नुसार अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष या प्रशासकीय कक्षाच्या अंतर्गत नॅक व सांख्यिकी विभाग आणि अविष्कार स्पर्धा, संशोधन योजना, शैक्षणिक व संशोधन समन्वयक योजना इत्यादी कामकाज तसेच तद्नुषंगिक इतर प्रशासकीय कामकाज अंतर्भूत करण्यात आले आहे.

अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष हा विधी विभाग इमारतीच्या दुस–या मजल्यावर कार्यरत होता. तसेच नॅक व सांख्यिकी विभाग आणि अविष्कार स्पर्धा, संशोधन योजना, शैक्षणिक व संशोधन समन्वयक योजना हे विभाग प्रशासकीय इमारत उत्तरखंड बाजूच्या पहिल्या मजल्यावर (जुना शैक्षणिक विभाग) याठिकाणी कार्यरत होते.

आता अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष हा प्रशासकीय कक्ष आणि त्याअंतर्गत असलेले नॅक व सांख्यिकी विभाग आणि अविष्कार स्पर्धा, संशोधन योजना, शैक्षणिक व संशोधन समन्वयक योजना हे उपविभाग प्रशासकीय इमारत दक्षिण बाजू (जुना परीक्षा विभाग) येथील तळमजल्यावर स्थलांतरित झालेले आहेत.

तरी याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११००७.
जावक क्र. साफुपुवि/अंगसिक/१६८
दिनांक – २७/०७/२०१८.

(डॉ. प्रफुल्ल पवार)
संचालक
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

१. मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलंग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था
२. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
३. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग